सकाळ

# 'पप्पा सांगा कुणाचे' चे प्रदर्शन

मराठी चित्रपट आणि रंगभूमीचा सुवर्णकाळ जपणाऱ्या अनेक कलाकारांची आठवण आजही रसिकांच्या मनात जिवंत आहे. अशाच आठवणींना उजाळा देणारा एक खास क्षण मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने अनुभवायला मिळाला. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळ उपक्रमांतर्गत ज्येष्ठ अभिनेते अरुण सरनाईक यांच्या जीवनावर आधारित 'पप्पा सांगा कुणाचे...' या माहितीपटाचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे पार पडला. या वेळी माहितीपटाच्या निर्मात्या सविता सरनाईक- नाईकनवरे, दिग्दर्शक संतोष पाठारे, संकलक सौरभ नाईक, विशाखा देशपांडे, संहिता पाठारे तसेच सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका श्रुती सडोलीकर काटकर उपस्थित होत्या. कार्यक्रमात माहितीपटाची निर्मिती कशी साकारली, त्यामागील भावना आणि आठवणी यांविषयी अनुभव मांडण्यात आले. उपस्थित रसिकांनीही अरुण सरनाईक यांच्या अभिनय आणि गायनाच्या प्रवासातील क्षण स्मरणात आणले. 'पप्पा सांगा कुणाचे...' हा माहितीपट त्यांच्या आयुष्यातील विविध पैलूंना उजाळा देणारा ठरत असून रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



भ
मालि
आले
लोट
भूमि
या च
निर्मा
होता.
देणे
आले.
सहभ
नसल
हातून
जात
सीझन
नावाच
मात्र,
कारण
बाजूल
दरम्या
शाहरु